# श्री. निळकंठ नामदेवराव वाघ

सेवक क्र. १२४

मु. वैशालीनगर, नागपूर

सन १९७० साली माझे लग्न झाले. लग्नानंतर काही दिवसांतच मी एका महान संकटात सापडलो. माझ्यात 'नपुंसकत्त्व' निर्माण झाले. लग्न होताच अशा दारूण प्रसंगात सापडल्यामुळे माझ्या कुटुंबात दुःख निर्माण झाले. या संकटातून मुक्त होण्याकरिता डॉक्टरी उपचार केले. देव-देवतांचेही उपचार केले. मांत्रिक व तांत्रिक लोकांकडून ही उपचार केले. तरीसुध्दा हे संकट काही केल्या दूर होईना. बाबांचे एकनिष्ठ सेवक व माझे मित्र श्री. गरीबदास कुंभारे मला नेहमी म्हणत असत की तुम्ही एक भगवान बाबा हनुमानजींच्या मार्गावर येऊन निर्व्यसनी बना व समाधानाने जीवन जगा. परंतु त्यांच्या शब्दावर माझा विश्वास बसला नाही. मी जुन्याच संस्कारात गुरफटला होतो. एक दिवस श्री. गरीबदास यांच्याशी गप्पा मारीत बसलो असताना त्यांनी तत्त्व, शब्द आणि नियम याबद्दल मला सविस्तर माहिती दिली. ती ऐकून मी घरी आलो. घरी जाऊन वडील बंधू व श्री. महादेवराव वाघ यांच्याशी मार्गावर येण्याबद्दल विचारविनिमय केला. हा मार्ग स्वीकारल्याशिवाय माझे नपुंसकत्त्व दूर होणार नाही हे सुध्दा घरी समजावून सांगितले. सविस्तर बोलणे झाल्यानंतर मार्ग स्वीकारण्याबद्दल परवानगी मिळाली. मी श्री. गरीबदास कुंभारे यांच्याकडे जाऊन माझा निर्णय सांगितला. त्यांनी आमची भेट महानत्यागी बाबा जुमदेवजींशी घडवून दिली. बाबांनी आम्हाला सरळ व सोप्या भाषेत मार्गदर्शन केले. बाबांचे मार्गदर्शन ऐकून आमचा आत्मविश्वास वाढला व बाबांच्या अमूल्य मार्गदर्शनाने आपण लवकरच या दुःखातुन मुक्त होऊ अशी खात्री वाटू लागली. बाबांनी कुटुंबातील लोकांशी एकमत करुन येण्यास सांगितले. कारण परमेश्वर एक आहे म्हणून एक परमेश्वर, एक लक्ष्य आणि एक विचार.

आम्ही घरी जाऊन कुटुंबात एक विचार करुन आलो व मार्ग स्वीकारला. मार्ग स्वीकारल्यानंतर एका वर्षातच परमेश्वराने मला योग दिला. परंतु 'देव देतो नि कर्म नेते' या म्हणीप्रमाणे बाबांनी दिलेल्या तत्त्व, शब्द, नियमांचे आमच्याकडून पालन न झाल्यामुळे बाळंतपणाची वेळ आली. तेव्हा माझ्या पत्नीला अतिशय त्रास होत होता. त्यामुळे अठ्ठेचाळीस तास बाळंतपण झाले नाही. डॉक्टरांनी सांगितले की मुलगा पोटातच मेलेला आहे. म्हणून ऑपरेशन करावे लागेल. तेव्हा आम्ही परमेश्वराला

विनंती केली की हे परमेश्वरा, आमच्यावर आलेल्या संकटाचे निवारण कर. परमेश्वराने आमची हाक ऐकली व लगेच डॉक्टरांच्या समोर पोटातच मरण पावलेला मुलगा ऑपरेशन न करता बाहेर पडला. हे दृश्य पाहून आम्हा सर्वांना आनंद झाला आणि तेथे असलेले डॉक्टर आश्चर्यखकीत झाले. पोटातच मरण पावलेला मुलगा ऑपरेशन न करता कसा काय बाहेर पडला याचे सर्वांना नवल वाटले. तेव्हा मी म्हणालो, हा तर भगवान बाबा हनुमानजींचा चमत्कार आहे. त्यांनी या महान संकटातून माझ्या पत्नीला मुक्त केले आहे. परंतु परमेश्वराने दिलेला योग आम्ही आपल्या वाईट कर्माने घालवला.

बाबांनी दिलेले तत्त्व, शब्द आणि नियमांचे पालन न केल्यामुळे व अमर्यादित बोलण्यामुळे दुःख कसे निर्माण झाले याचा मला आलेला अनुभव पुढे देत आहे.

बाबांनी दिलेल्या नियमांतील पाचव्या नियमानुसार मानव मंदिर सजविण्याकरिता फंड अनुदानामध्ये पैसे भरण्याकरिता मी माझ्या पत्नी जवळ माझा विचार मांडला. सध्या आपल्याजवळ पैसे नसल्यामुळे आपण आपल्याजवळ असलेले दागिने विकून फंडात पैसे जमा करु. त्याकरिता तुझ्या गळ्यात असलेला कंठा वडील भङ्गवाजवळ दे असे मी तिला म्हटले. नंतर भावाला त्याची सुचना देऊन मी ऑफीसला निघून गेलो. मोठ्या भावाने माझ्या पत्नीला कंठ्याची माणगी केली तेव्हा माझी पत्नी भावाला अमर्यादितपणे बोली. तुम्ही आपल्या बोयकोला विकून फंडात पैसे गोळा का करीत नाही, तुमच्या डोळ्यात माझाच कंठा दिसतो काय असे तोंडाला येईल ते अद्वातद्वा ती त्यांना बोलली. त्यावेळी माझे वडील भाऊ शांत राहिले पण त्यांच्या मनाला अतिशय दुःख झाले. माझ्या पत्नीचे अमर्यादित बोलणे परमेश्वराने ऐकले होते. दुसऱ्याच दिवशी दुपारच्या वेळी माझी पत्नी वाड्यात हातपाय धूत असताना एकाएकी किंचाळी मारुन ओरडली. आम्ही धावत जाऊन पाहतो पर तिचे तोंड वाकडे झालेले, आणि जीभ बाहेर निघालेली असे दृश्य दिसले. तिला बोलता येत नव्हते. तेव्हा लगेच तिला त्याच अवस्थेत मेयो हॉस्पीटलमध्ये भरती करण्याकरिता घेऊन गेलो. डॉक्टरांनी तिला तपासल्यावर कोणत्याच प्रकारची बिमारी नाही म्हणून सांगितले. हिला कोणीतरी मारले असावे अशी शंका त्यांनी व्यक्त केली. लगेच माझ्या मनात विचार आला की, हिला कोणी प मारता हिच्यावर असे प्रसंग येण्याचे कारण कोणते? आणि मारणारा कोण? त्याच वेळेस माझे वडील भाऊ ओढवलेल्या प्रसंगाची सूचना देण्याकरिता महानत्यागी बाबा जुमदेवजींकडे गेले. त्यांनी वरील दुःखाबद्दल माहिती सांगितली. त्याचप्रमाणे माझी पत्नी जे अमर्यादितपणे शब्द बोलली होती ते सुध्दा सांगितले. नंतर बाबांनी मार्गदर्शन केले. पत्नीच्या अमर्यादित बोलण्यामुळेच तिच्यावर कठीण प्रसंग ओढवला असून तिने त्याबद्दल भगवान बाबा हनुमानजींची माफी मागितली पाहिजे असे सांगितले. बाबांचे मार्गदर्शन ऐकून वडील भाऊ दवाखान्यात आले व त्यानी वरील हकीगत मला सांगितली. तेव्हा मी पत्नीला

म्हणालो, तुला जरी बोलता येत नाही तरी तू मनातल्या मनात वडील भावाला अमर्यादितपणे बोलल्यामुळे झालेल्या चुकीची भगवान बाबा हनुमानजींना तसेच महानत्यागी बाबा जुमदेवजींना क्षमा माग. क्षमा मागितल्यावर तिला झोप लागली. अर्ध्या तासानंतर तिला जाग आली तेव्हा आपोआप तिची जीभ आत गेलेली व तोंड पूर्ववत झालेले दिसले. ती लगेच उठून बसली व माझ्याशी बोलू लागली. हे सर्व पाहून तेथे असलेले डॉक्टर्स आश्चर्यचकित झाले. कोणतेही औषध न देता हे कसे काय घडले याचा विचार ते करु लागले त्यानंतर डॉक्टरांनी तिला घरी घेऊन जाण्याची परवानगी दिली.

ऑगस्ट १९७४ मध्ये माझी प्रमोशनवर रामटेकला बदली झाली होती. एकाच आदेशाने दहा कर्मचाऱ्यांनी नागपूरला बदली करण्यात आली. मला रामटेकला पाठविण्यात आले. आदेश मिळाल्यावर मी मुख्य कार्यापालन अधिकाऱ्यांना भेटलो. मी माझी अडचण सांगितली. ते म्हणाले प्रथम तुम्ही रुजू व्हा. मग पाहू. तुम्ही उद्याला भेटा मी खिन्न होऊन घरी आलो. रामटेकला बदली झाल्याबद्दल पत्नीला सांगितले. घरभाडे व शहर भत्ता मिळून १०० रु. चे दर महिन्याला नुकसान होणार होते. महानत्यागी बाबा जुमदेवजींच्या दर्शनास गेलो असता रामटेकला बदली झाली असून दरमहा १०० रु. चे नुंकसान होणार आहे असे बाबांना सांगितले. बाबांनी मला एकच प्रश्न विचारला. तुमची काय इच्छा आहे? नागपूरला राहण्याची इच्छा आहे असे मी बाबांना सांगितले तेव्हा बाबांनी खालीलप्रमाणे मार्गदर्शन केले. 'परमेश्वराला विनंती करा व जे तुम्हाला पाहिजे ते मागा. तो सर्व काही घडवू शकतो.'

मी घरी जाऊन बाबांनी केलेले वरील मार्गदर्शन पत्नीला सांगितले व तिला म्हणालो, माझी रामटेकची बदली रद्द करण्याकरिता आपण दोघे मिळून परमेश्वरास विनंती करु. त्याचप्रमाणे आम्ही दोघांनी विनंती केली. तीन वेळा दोघांनी विनंती केली. दुसऱ्या दिवशी ऑफीसला गेलो. बाबांच्या मार्गदर्शनावर माझा विश्वास होता. माझे कार्य सफल झाल्याशिवाय राहणार नाही याची खात्री होती. कार्यालयात जाऊन प्रथम मी मुख्य कार्यपालन अधिकारी यांना भेटलो. त्यांनी मला स्पष्ट सांगितले की मी हा आदेश बदलविणार नाही. अगोदर तुम्ही रुजू व्हा. मग मी पाहीन. नागपूरला नवीन कार्यालयात रुजू झालो तेव्हा साहेबांनी पुन्हा मला सांगितले की तुम्हाला नागपूर हेड ऑफीसला मी ठेवणार नाही. चिंता करु नका. पण सी.ई.ओ. साहेब बदली करण्यास तयार नव्हते. बाबांच्या मार्गदर्शनाकडे माझे लक्ष होते. मी विचार करीत होतो की असे होण्याचे कारण काय? बदली रद्द करण्यास सी.ई.ओ. तयार होत नव्हते. मला एकदम शंका आली की आम्ही दोघांनी मिळून प्रार्थना केली आहे. पत्नीने परमेश्वरास काय विनंती केली कोणास माहीत. परमेश्वराविषयी माझा आत्मविश्वास असल्यामुळे पत्नीने मी सांगितल्याप्रमाणे विनंती केली नसेल. मला तिचा राग आला व मी घरी येऊन पत्नीला रागावून विचारले की तू परमेश्वराला बदलीबाबत काय विनंती केली

आहे. तुझ्या अशा प्रार्थनेमुळेच माझे कार्य असफल झाले असे मी पत्नीला म्हणालो. परमेश्वराने दोघांच्याही शब्दाला मान दिला. दोघांचेही ऐकले. नवीन साहेबांनी मला नागपूरला ठेवून घेतले पण दरमहा १०० रु. चे नुकसान झाले. नागपूरला काम करायचे आणि रामटेकचा पगार मिळायचा. त्यानंतर मी पत्नीस सांगितले तु तुझे शब्द परमेश्वराला विनंती करुन मागे घे. तिने परमेश्वराची क्षमा मागून आपले शब्द परत घेतले. तीनच महिन्यात पुनः नागपूरला माझ्या बदलीची ऑर्डर निघाली व झालेले आर्थिक नुकसानही भरुन निघाले.

* * * * *